
# लाला लजपतराय

टी. के. रामराव

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9394



BVBK-0401315

वाच. बा. वा.
९३९५
६/१/८२

पुष्प ८

# लाला लजपतराय

लेखक

टी. के. रामराव

अनुवादक

वामन दीक्षित

BVBK-0401315

मुख्य सम्पादक

एल. एस. शेषगिरिराव

भारत-भारती [मराठी संस्करण]

ईकर पथ, नागपुर ४४०००२ (महाराष्ट्र)

प्रकाशक

भारत-भारती [मराठी संस्करण] बाल-पुस्तकमाला

प्रभाकर फैजपुरकर

मंत्री

श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती

रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

सम्पादक, मराठी संस्करण

सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण आक्टोबर १९८०

किंमत रु. २–००

मुद्रक

वि. भि. घाक्स

नाथ मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर–२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटचा-छोटचा पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी सान्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमाला लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

सम्पादक

शाखा.
क्र. १३१५ दि. ६।७।८२

# लाला लजपतराय

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात इंग्रजी सत्तेच्या क्रूर लाठीने वीरगती मिळालेला लाला लजपतराय हा स्वातंत्र्य-सेनानी, 'पंजाब-केसरी' या नावाने ओळखला जातो.

त्यांनी राजकारणाबरोबरच शिक्षण, हिंदू-संघटन, समाज-सुधारणा इत्यादी क्षेत्रांतही कामगिरी बजावली आहे. प्रभावी वक्तृत्व आणि समर्पित जीवन यामुळे ते भारतीय जनतेचे प्रेरणाकेंद्र बनले होते.

दा. क्र. 9395 ५.१.८२
विषय

# लाला लजपतराय

३० ऑक्टोबर १९२८. लाहोरची जाहीर सभा 'पंजाब केसरी' लाला लजपतराय यांच्या प्रभावी निनादाने भारली होती.

"आमच्यावर होणारा लाठीचा प्रत्येक वार इंग्रजी साम्राज्यशाहीच्या शवपेटीवरील एकेक खिळा ठरेल."

लाठीच्या प्रहाराची वेदना शरीरापेक्षा मनावर अधिक प्रभाव पाडीत होती. ब्रिटिश शासनाच्या भयंकर अत्याचाराने मन उद्विग्न झाले होते. या घटनेनंतर सतराव्या दिवशी सकाळी या थोर पुरुषाचे प्राण अनंतात विलीन झाले. लाला लजपतराय आम्हाला सोडून गेले. परंतु त्यांच्या असंख्य अनुयायांनी त्यांचे कार्य पुढे चालविले. स्वातंत्र्याचा लढा चालूच राहिला.

## मेधावी छात्र

लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ रोजी पंजाबातील फिरोजपूर जिल्ह्यातील घुडिके गावी झाला. त्यांचे वडील लाला राधाकिशन सरकारी शाळेत उर्दू शिक्षक होते. स्वातंत्र्यप्रेम व स्वाभिमान यासाठी प्रसिद्ध असलेल्या अग्रवाल कुळात लाला राधाकिशन यांचा जन्म झाला. लाला लजपतराय यांच्या मातोश्रीला लिहिता-वाचता येत नव्हते, पण ती आदर्श हिन्दू साध्वी होती. लालाजींना राष्ट्रभक्तीचे बाळकडू तिनेच पाजले.

शाळेत लालाजी कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी होते. त्यांनी अनेक बक्षिसे पटकावली. अनारोग्य व घरची गरिबी हे त्यांच्या शिक्षणात अडसर बनू पाहत होते. तरीही १८८० मध्ये कलकत्ता विद्यापीठाची प्रवेश परीक्षा ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्याच वर्षी पंजाब विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेत देखील ते यशस्वी झाले. त्यानंतर लाहोरच्या शासकीय महाविद्यालयात त्यांना प्रवेश

मिळाला. सोबतच ते कायद्याचा अभ्यास करीत होते. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना दोन वर्षेपर्यंत शिक्षणाला विराम द्यावा लागला.

## आदर्शाची पहाट

लालाजींनी लाहोरमध्ये घालविलेली दोन वर्षे त्यांच्या जीवनात फार महत्त्वाची ठरली. या काळात त्यांनी भारताच्या प्राचीन वैभवसंपन्न इतिहासाचा अभ्यास केला. भारतातील थोर नर-रत्नांची चरित्रे वाचताना लालाजींचे डोळे पाणावत असत. स्वातंत्र्यप्रेम व देशसेवेची तीव्र लालसा याच काळात त्यांच्या मनात उद्भवली. त्यावेळी स्वामी दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेला 'आर्य समाज' सार्वजनिक कार्यात अग्रेसर होता. आर्य समाजाच्या विकासोन्मुख आदर्शाकडे व समाज-सुधारणेच्या योजनांकडे पंजाबचा तरुणवर्ग आकर्षित झाला. लालाजी त्यावेळी फक्त १६ वर्षांचे होते. १८८२ मध्ये ते आर्य समाजाचे सदस्य बनले. तेव्हाच त्यांच्या सार्वजनिक जीवनाची पहाट झाली. राष्ट्रभक्ती प्रकटली. भारतीयांच्या गुलामीच्या बेड्या तोडण्याचा दृढसंकल्प त्यांनी केला.




भारताचा प्राचीन गौरवपूर्ण इतिहास वाचताना
त्यांचे डोळे पाणावत.

१८८३ मध्ये लालाजी कायद्याची पहिली परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी प्रारंभिक वकिली (मुख्तारी) करण्याची परवानगी मिळविली. घराची जबाबदारी तर त्यांनाच सांभाळावयाची होती. वयाच्या अठराव्या वर्षी जंग्राव गावाच्या महसूल न्यायालयात (रेव्हेन्यूकोर्ट) त्यांनी वकिली सुरू केली. पुढे १८८६ मध्ये (वकिलीची) कायद्याची पदवी परीक्षा देऊन दक्षिण पंजाब-मधील हिसारला त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला.

या व्यवसायात पैसा मिळवून चैनीचे जीवन व्यतीत करावे हे काही त्यांचे ध्येय नव्हते. इटालीचा थोर क्रांतिकारक मॅझिनी याचे जीवन-चरित्र वाचण्याची तीव्र इच्छा त्यांना झाली. हे चरित्र त्यावेळी भारतात उपलब्ध नव्हते. त्यांनी इंग्लंडात राहणाऱ्या आपल्या एका मित्राला पत्र धाडून तेथून ते पुस्तक मागविले. धाडसी वृत्ती, उदार अंतःकरण व राष्ट्राभिमान हे मॅझिनीचे गुण त्यांना नेहमीच प्रेरणा देत राहिले.

## सार्वजनिक सेवाकार्य

हिसार येथील सहा वर्षांचे लालाजींचे वास्तव्य हा त्यांच्या भविष्यकालीन सार्वजनिक कार्याच्या शिक्षणाचा कालखंड ठरला. स्वामी दयानंदजींच्या स्वर्गवासानंतर लालाजींनी आपल्या सहकाऱ्यांसोबत दयानंद अँग्लोवैदिक कॉलेजच्या (डी. ए. व्ही. कॉलेजच्या) उन्नतीसाठी बरीच मेहनत घेतली. आर्य समाजाने सामाजिक सुधारणा, हिंदू-धर्मप्रसार आणि शिक्षणाचे ध्येय आपल्यासमोर ठेवले होते. लालाजींचे मासिक उत्पन्न एक हजार रुपयाहून अधिक होते. त्यापैकी काही रकम बँकेत जमा करून त्यावरील व्याज आपल्या वडिलांना मिळावे, अशी व्यवस्था त्यांनी केली होती. त्यामुळे त्यांचे वडील निर्धास्त राहू शकत. त्यांच्या कमाईच्या १० टक्के रक्कम ते देशकार्यासाठी राखून ठेवत. त्यातील बराच वाटा आर्य समाजाच्या कामासाठी वापरला जाई.

लेफ्टनंट गव्हर्नराच्या हिसार भेटीच्या वेळी त्यांना मानपत्र दिले जायचे होते. लालाजींचा

आग्रह होता की मानपत्र इंग्रजीऐवजी उर्दूत असावे. इंग्रज अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी भाषणाची प्रत देखील इंग्रजीतच लिहिली गेली होती. लालाजींच्या या आग्रहामुळे सारेच घाबरले. पण लालाजींनी निर्भीडपणे उर्दू भाषेतूनच मानपत्र सादर केले. त्यामुळे इंग्रजांची त्यांच्यावर खपा-मर्जी झाली.

त्यांचा बहुतांश वेळ आर्य समाजाच्या कामातच खर्ची पडे. आपल्या अथक मेहनतीने त्यांनी आर्य समाजाच्या अनेक शाखा सुरू केल्या. शिक्षणसंस्था स्थापन केल्या. तरीही ते सांप्र-दायिकतेपासून दूरच राहिले होते. बहुसंख्य मुस्लिम क्षेत्रातून ते नगरसभेवर अविरोध निवडले गेले होते.

## राजकारणप्रवेश

१८८८ साली वकिली सोबतच त्यांनी राज-कारणातही प्रवेश केला. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्ती-साठी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (इंडियन नॅशनल कॉंग्रेस) झुंजत होती. राष्ट्राचे स्वातंत्र्य अत्यावश्यक जाणून लालाजींनी स्वातंत्र्य–सैनिक बनून कॉंग्रेस-

मध्ये प्रवेश केला. यावेळेपर्यंत काँग्रेसमध्ये असलेल्या सर सय्यद अहमद यांनी काँग्रेस सोडली व असा प्रचार सुरू केला की मुसलमानांनी काँग्रेसमध्ये जाऊ नये. एवढेच नव्हे तर मुस्लिमांनी ब्रिटिश सरकारला समर्थन द्यावे, असाही प्रचार आरंभिला. लालाजींनी उर्दू साप्ताहिक 'कोहिनूर' मधून सय्यद अहमदच्या विचारांचा खरपूस समाचार घेतला. राजकीय क्षेत्रात त्यांच्या या पत्रांना जोरदार समर्थन आणि महत्त्व प्राप्त झाले. याचवर्षी प्रयाग (अलाहाबादला) काँग्रेसचे वार्षिक संमेलन झाले. अधिवेशन मंडपात आपल्या ८० सहकाऱ्यांबरोबर लालाजींनी प्रवेश करताच त्यांचे भव्य स्वागत झाले. अधिवेशनात त्यांच्या ओजस्वी भाषणाचा काँग्रेसच्या नेत्यांवर बराच प्रभाव पडला. त्यावेळी लालाजी फक्त २३ वर्षे वयाचे तरुण होते. पुढे काँग्रेसमध्ये त्यांची प्रतिष्ठा वाढतच गेली.

## लाहोरात

सार्वजनिक कार्याच्या वाढीबरोबरच त्यांच्या हे अनुभवास आले की हिसार नगर बरेच लहान

आहे. पंजाबच्या उच्च न्यायालयात कार्य करण्याची पात्रता मिळवून १८९२ मध्ये ते लाहोरात दाखल झाले. १८९३ मध्ये कांग्रेसचे महाधिवेशन लाहोरला झाले. या संमेलनाचे अध्यक्ष ब्रिटिश पार्लमेंटचे प्रथम भारतीय सभासद दादाभाई नौरोजी हे होते. लालाजींनी स्वयंसेवक बनून उत्साहाने काम केले.

लालाजी नेहमीच कार्यमग्न असत. विसावा घेणे तर त्यांना ठाऊकच नव्हते. लालाजी काँग्रेसच्या कार्यात गुंतलेले असतानाच आर्य समाजात फूट पडू लागली. लालाजींनी आपल्या प्रयत्नांनी आर्य समाजात नवचैतन्य निर्माण केले. डी. ए. व्ही. कॉलेजच्या भल्यासाठी कंबर कसून ते उभे ठाकले.

## विजेसारखी लेखणी

लालाजी अव्वल दर्जाचे लोकनायक तर होतेच पण ते सिद्धहस्त लेखकदेखील होते. त्यांनी उर्दूत लिहिलेली काही जीवन - चरित्रे

उल्लेखनीय आहेत. त्यांनी इटलीतील देशभक्त व संघटक मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांची चरित्रे तसेच श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी आणि दयानंद सरस्वती यांच्या जीवनावर पुस्तके लिहिली. मॅझिनी आणि शिवाजीच्या चरित्रातून जनतेला स्वातंत्र्य-प्राप्तीचा प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शासनाने या पुस्तकांवर बंदी घालण्याचा विचार सुरू केला.

## दीनदुबळ्यांचे व दलितांचे सेवक

गरिबांची, दलितांची, दु:खितांची सेवा करण्यासाठी लालाजी नेहमीच तत्पर असत. त्यांच्या मदतीसाठी लालाजींनी केलेल्या कष्टातून त्यांच्या सार्वजनिक जीवनातील विविधता प्रत्ययास येते. त्यामुळे त्यांचे जीवन अधिकच उजळून निघाले आहे.

१८९६ साली मध्यप्रांतात भयंकर दुष्काळ पडला. पावसाभावी लोक त्रस्त झाले होते. त्या काळी अनाथ मुले, भुकेले गरीब लोक ख्रिश्चन

मिशनऱ्यांच्या प्रचाराला बळी पडत, ते अधिकाधिक संख्येने ख्रिश्चन बनत होते. लालाजींनी या अनाथांच्या कष्टनिवारणार्थ अविरत प्रयत्न केले. जबलपूर, बिलासपूर वगैरे जिल्ह्यातून २५० अनाथ मुलांना पंजाबात आणून तेथील आर्य समाजाच्या अनाथालयात ठेवले.

जेव्हा समाजसेवा व वकिली या दोन्ही गोष्टी नीट चालविण्यास त्यांना वेळ अपुरा पडू लागला तेव्हा १८९८ मध्ये लालाजींनी वकिलीच्या कामाला आवर घातला.

१८९९ मध्ये तर पंजाब, राजस्थान, काठेवाड (गुजरात) आणि मध्यप्रांत यांत फारच भयंकर दुष्काळ पडला. पुन्हा अनाथ बालकांच्या संरक्षणाचा प्रश्न उभा राहिला. लालाजी आर्य-समाजी कार्यकर्त्यांचा नेता म्हणून समोर आले. तो त्यांच्या सत्त्वपरीक्षेचाच काळ होता. त्यांनी असामान्य कार्य करून दाखविले. जवळजवळ दोन हजार अनाथांना अन्न, वस्त्र, काम व शिक्षण देऊन त्यांचे रक्षण केले. हे काम करत

असताना ख्रिश्चन धर्मप्रचारकांशी प्रसंगी त्यांना दोन हातही करावे लागले. १९०१ मध्ये शासनाने दुष्काळ निवारण समिती बनविली. या समितीने लालाजींचा सल्ला घेतला व अनाथांविषयी आपल्या धोरणात लालाजींच्या सल्ल्यानुसार बदल केला. त्यामुळे हिंदूंना तसेच इतर धर्मीयांना आपापली अनाथालये चालविणे शक्य झाले.

१९०५ साली जनतेच्या हालअपेष्टा निवारणाच्या कामासाठी लालाजींना अधिक सर्वंकष काम करावे लागले. कांगडा जिल्ह्यात जोरदार धरणीकंप झाला. जीवित व मालमत्तेचे अपरिमित नुकसान झाले. लाहोरच्या आर्यसमाजाने सहायता समिती निर्मिली. लालाजी या समितीचे कार्यवाह होते. त्यांनी संपूर्ण पंजाबात फिरून निधी जमविला. त्यांच्यामुळे अविस्मरणीय असे सेवाकार्य घडून आले.

### इंग्लंड भेट

याचवर्षी इंग्लंडात सार्वत्रिक निवडणुका व्हावयाच्या होत्या. त्यापूर्वी तेथील जनतेला भार-

ताच्या दैन्यावस्थेची माहिती करून देणे अगत्याचे होते. भारतीय राष्ट्रीय कांग्रेसने या कार्यासाठी दोन प्रतिनिधी पाठविण्याचा निर्णय घेतला. श्री. गोपालकृष्ण गोखले व लाला लजपतराय हे ते दोन प्रतिनिधी होत. दोघेही ब्रिटनची यशस्वी यात्रा आटोपून लाहोरला परतले. लाहोर स्थानकावर हजारो लोकांनी त्यांचे भव्य स्वागत केले. विद्यार्थ्यांनी त्यांना न्यावयाच्या बग्गीचे घोडे सोडून दिले व ती स्वतः ओढली.

इंग्लंड प्रवासात लालाजींनी तेथील जनते-समोर अनेक भाषणे दिली. ब्रिटिशांच्या शासन-काळात भारतीय जनतेची होत असलेली ससे-होलपट चित्रित केली. पण त्यांना तेथे आलेला अनुभव याहूनही महत्त्वाचा होता. त्यांना या गोष्टीची स्पष्ट जाणीव झाली की भारताचे भविष्य भारतीयांच्या प्रयत्नांनीच घडविले जाऊ शकेल. त्यासाठी शासकीय सूत्रे ही भारतीय जनते-च्याच हाती यायला हवीत. स्वातंत्र्यासाठी लढा, स्वदेशी वस्तूंचा वापर आणि परकीय वस्तूंवर बहिष्कार असा त्रिविध संकल्प केला पाहिजे, असा

त्यांनी निर्णय घेतला. १९०७ च्या सुरत कॉंग्रेस मध्ये त्यांनी या सर्व बाबी लोकांपुढे मांडल्या.

## शासनाचा क्रोध

१९०७ हे वर्ष लालाजींच्या जीवनातील धाडसी वर्ष ठरले. जनतेत नव्या भावना, नव्या आशा-आकांक्षा व उत्साह याचा संचार झाला होता. हे नवचैतन्याचेच वर्ष होते. लाहोर आणि रावळपिंडीला दंगली झाल्या. मीरतला स्वातंत्र्य-युद्धाची ५० वी जयंती साजरी करण्याची तयारी सुरू होती. पंजाब शासनाने पाणीपट्टी वाढविल्यामुळे शेतकरी संतप्त झाला होता. लालाजी व इतर काही वकील शेतकऱ्यांच्या मदतीला पुढे आले. शासनाच्या दृष्टीने तो फार मोठा गुन्हा होता.

पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर सर डेन्सिल इबेट-सन याने ब्रिटिश मंत्रिमंडळातील भारतीय बाबीशी संबंधित मंत्री लॉर्ड मोर्ले यांना लिहून कळविले, "लालाजीसारख्या काही नेत्यांनी, इंग्रजांना या ना त्या प्रकारे भारताबाहेर घालविण्याची प्रतिज्ञा

केली आहे, असे दिसते. जनतेत इंग्रजांविषयी द्वेष उत्पन्न करून शासनयंत्रणा मोडकळीस आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.''

शासकीय अधिकाऱ्यांविषयी जनतेत संशयाचे जाळे विणले जात होते. याच सुमारास एका इंग्रजाने एका गरीब भारतीयाचा मुडदा पाडला. वर्तमानपत्रात त्याचे खरे स्वरूप बाहेर आले. शासनाने एका पत्रकारावरच या खूनाचा आरोप लादण्याचा प्रयत्न केला. पंजाबच्या जनतेने शासनाच्या या कुटिलतेचा विरोध केला. याच वेळी शासनाने आणलेला वसाहती संबंधीचा कायदा, जमिनीच्या हस्तांतरासंबंधीच्या कायद्यात दुरुस्ती, जमीन व पाणी यावरील पट्टीत वाढ, आदींबद्दल चालू असलेल्या चळवळीही एकत्र आल्या. त्यामुळे सर डेन्सिल बावरले. लालाजी व भगतसिंहाचे भाऊ अजितसिंह यांची कारणे न देताच ब्रह्मदेशात मंडालेला रवानगी करण्यात आली. कोणतेही कारण न देता उगाचच उचल-लेल्या या पावलाचा संपूर्ण देशभर विरोध झाला.

लोकमान्य टिळकांनी 'केसरीत' लिहिले, "ब्रिटिश शासक रशियाच्या शासकाप्रमाणे राज्य करू इच्छितात. त्यामुळे भारतीय जनतेची प्रतिक्रिया-देखील रशियन जनतेसारखीच राहील. जनतेच्या व वकिलांच्या विरोधापुढे शासनाला नमते घ्यावे लागले. त्यांच्या हे लक्षात आले की देशाबाहेर घालविण्याची त्यांची आज्ञा चुकीची व अन्याय्य होती. त्यामुळे लालाजींना १८ नोव्हेंबर रोजी बंधमुक्त करून लाहोरला आणून सोडण्यात आले.

कांग्रेसच्या तीन जहाल नेत्यांपैकी लालाजी एक होते. इतर दोघे महाराष्ट्रातील बाळ गंगाधर टिळक आणि बंगालचे बिपिनचंद्र पाल हे होत. भारतीय जनता प्रेमपूर्वक त्यांना लाल, बाल, पाल म्हणून संबोधित असे. कांग्रेसच्या जहाल व मवाळ लोकांत विरोध निर्माण झाला. दोन्ही गटांत समेट घडविण्याचा प्रयत्न लालाजींनी केला. तो वांझोटा ठरला. त्यामुळे लालाजी काही काळ काँग्रेसपासून विभक्त झाले.

१९११ साली दुसऱ्यांदा ते लाहोर नगर-सभेवर निवडले गेले. निवडणुकीला ते जेव्हा उभे राहिले तेव्हा त्यांची लोकप्रियता अमर्याद होती. आंधळे, बहिरे व पांगळे या सर्वांनी श्रद्धापूर्वक त्यांना मतदान केले. एका मुक्याने आपण कोणाला मतदान करू इच्छितो, हे सांगण्यासाठी लालाजींचा फोटोच सोबत आणला होता.

## परदेशात

१९१२ मध्ये लालाजींनी पुन्हा काँग्रेस-प्रवेश केला आणि एप्रिल १९१४ मध्ये काँग्रेसच्या एका शिष्टमंडळासोबत पंजाबचे प्रतिनिधी म्हणून ते इंग्लंडला गेले. सहा महिने-पावेतो तेथे राहण्याचा त्यांचा विचार होता. परंतु पहिले महायुद्ध सुरू झाल्यामुळे त्यांना आपल्या योजनेत बदल करावा लागला. ताबडतोब भारता-कडे परतणेही योग्य वाटले नाही. ब्रिटिश शासन त्यांना दीर्घकाळ तुरुंगात डांबून ठेवण्याची शक्यता होती. म्हणून लालाजी इंग्लंडातून अमेरिकेस गेले.




लालार्ज

१३९५ दि. ६।१।८२



र लाठीहल्ला

अमेरिकेला जाण्याचा त्यांचा हा निर्णय स्वतःला देशापासून दूर ठेवण्यासारखा होता. लालाजींनी अमेरिकेत कित्येक सार्वजनिक भाषणे दिली. भारतीय परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती अमेरिकन जनतेला करून देण्याचा प्रयत्न केला. पुस्तके लिहिली भारतीय स्वातंत्र्यचळवळीला वेग देण्यासाठी 'इंडियन होमरूल लीग' (भारतीय स्वयंशासक संघ) ची स्थापना केली. बरेच दिवस अमेरिकेत राहणाऱ्या या भारतीय वीराला कामाची मुळीच वाण नव्हती. त्यांनी तेथे 'इंडियन इन्फर्मेशन ब्यूरो' (भारतीय समाचार समिती) स्थापन केली. 'यंग इंडिया' (तरुण भारत) या नावाने वर्तमानपत्र सुरू केले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यचळवळ वाढीस लागली. ते स्वतः याचे संपादक होते. त्यांनी या वर्तमानपत्रातून भारतीय संस्कृतीचा प्रचार व भारतीय स्वातंत्र्याची आवश्यकता प्रतिपादिली. 'यंग इंडिया' लवकरच लोकप्रिय झाले. त्याचा खपही वाढला. अमेरिकावासी भारतीय मोठ्या आवडीने हे पत्र वाचीत, तसेच अमेरिकी व तेथील इतरदेशीयही ते वाचत असत. लालाजींचे

ध्येय कळल्यामुळे भारताविषयी त्यांच्या मनात सहानुभूती उत्पन्न झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्य-चळवळीला त्यांचा पाठिंबा मिळाला.

अमेरिकेतील वास्तव्यात लालाजींनी दोन पुस्तके लिहिली. एक "आर्य समाज" व दुसरे "इंग्लंडस् डेट इन इंडिया" अमेरिकेतील त्यांचे जीवन ख्याली-खुशालीचे नव्हते. ते स्वत: स्वयंपाक करीत. लेखन व पुस्तकप्रकाशनातून मिळणाऱ्या पैशातून ते आपला खर्च चालवीत. महायुद्धात भाग घेणाऱ्या जर्मनशासनाने लालाजींचे समर्थन मिळवून भारतीय असंतोषाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. पण लालाजींनी जर्मन शासनाचे ऐकले नाही.

अमेरिकेत राहत असताना त्यांनी तेथूनच जपानलाही भेट दिली. दोन्ही देशांतील प्रभावी आणि योग्य सज्जनांची सहानुभूती मिळविली. लालाजींचा व्यवहारच असा होता की या दोन्ही देशातील लोक त्यांच्या प्रयत्नावर विश्वास ठेवू लागले होते. महायुद्ध संपल्यावर लालाजींना

भारतात परतायचे होते; पण इंग्रजांनी त्यांना परवानगी नाकारली. भारतात इंग्रज सरकारने अमृतसरला जालियनवाला बागेत जमलेल्या शांत लोकांवर गोळीबार करून सामूहिक हत्याकांड घडविले. लालालींना न्यूयार्कला ही भयंकर बातमी कळली. आपल्या देशबांधवांच्या भेटीसाठी ते आतुर झाले होते. वर्षअखेर त्यांना भारतात परतण्याची परवानगी मिळाली. डिसेंबर १९१९ मध्ये लालाजी अमेरिकेहून लंडनला पोहोचले. आपल्या लंडन मुक्कामात त्यांनी प्रसिद्ध लेखक बर्नार्ड शॉची व काही समाजवादी नेत्यांची भेट घेतली. त्यानंतर ते पॅरिसला पोहोचले.

## असहकारिता चळवळ

स्वदेशाविषयी परदेशी लोकांत विशेष जागृती निर्माण करून फेब्रुवारी १९२० मध्ये ते मायदेशी परतले. लोकमान्य टिळक, जिना व ॲनी बेझंट यांनी लालाजींचे वीरोचित स्वागत केले. मुंबई, दिल्ली व लाहोर येथील सार्वजनिक सभांत त्यांना मानपत्र दिले गेले. १९२० साली झालेल्या

कॉंग्रेसच्या खास अधिवेशनासाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली.

पुढील वर्षी गांधीजींनी असहकारिता चळवळ आरंभिली. देशभर ही चळवळ जोराने फोफावली. लालाजींनी त्यांचे परम स्नेही क्रांतिकारक अजितसिंह यांच्या बरोबर या चळवळीत उडी घेतली. लालाजींच्या सिंहगर्जनेने व हृदयस्पर्शी आवाहनाने संपूर्ण पंजाब प्रांत या चळवळीत सम्मिलित झाला. परिणामस्वरूप इंग्रजांचे बलदंड शासन हादरले. सरकारी शाळा-कॉलेजांवर बहिष्कार टाकण्यात आला. न्यायालयातील व कार्यालयातील कामे तुंबून पडली. जनतेने साम्राज्यशाहीचा विरोध करण्यासाठी कंबर कसली. लालाजींनी लाहोरात राष्ट्रीय शाळा सुरू केली. 'टिळक राजनीतिशास्त्र शाळे'ची स्थापना केली. त्यामुळे तरुणांना योग्य शिक्षण देण्याची सोय झाली. या कार्यासाठी लालाजींनी पंजाबचा दहा दिवसाचा झंझावती दौरा केला. लालाजीवरील श्रद्धेमुळे या कार्यासाठी जनतेने मुक्त दान दिले. एकूण नऊ लाखांचा निधी गोळा झाला.

## तुरुंगवास

लाला लजपतराय यांचे संघटनकौशल्य अमर्याद होते. त्यांची ओघवती वाणीदेखील प्रभावी होती. दिवसेंदिवस फोफावत चाललेली असहकारिता चळवळ सहन करणे शासनाला जड जाऊ लागले. देशभर संप, निदर्शने चालू होती. शासनाचा जळफळाट झाला. सरकारच्या नजरेत लालाजी भयंकर ठरले. १९२१ मध्ये लालाजींना बंदिस्त करण्यात आले. या चळवळीचे इतर नेते मोतीलाल नेहरू व चित्तरंजनदासही पकडले गेले. लालाजींना अठरा महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सार्वत्रिक विरोध आणि वकिलांनी आग्रहपूर्वक मांडलेल्या युक्तिवादामुळे दोन महिन्यातच लालाजींना सोडून देण्यात आले. त्यांना जेव्हा तुरुंगाबाहेर आणले तेव्हा रात्रीचा एक वाजला होता. ते दरवाजाबाहेर येताच त्यांना पुन्हा अटक करण्यात आली.

दुसऱ्या वेगळ्या आरोपाखाली त्यांना दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली. तुरुंगात

ते आजारी झाले, प्रकृती खालावली. ही वार्ता जनतेपर्यंत पोहोचली. देशभर त्यांच्या सुटकेसाठी चळवळ उभी राहिली. शेवटी सरकारला त्यांना सोडावे लागले. लालाजी प्रकृती सुधारावी म्हणून सोलनला गेले.

## हिंदूसंघटन

विश्रांतीनंतर पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली. मोतीलाल नेहरूंनी स्थापन केलेल्या स्वराज्य पक्षात लालाजी गेले. केंद्रीय विधान परिषदेवर ते निवडून गेले. यावेळेपावेतो महात्मा गांधींनी निर्माण केलेली हिन्दू-मुस्लिम ऐक्याची भावना विरत चालली होती. लालाजींना सांप्रदायिक प्रश्नाकडे लक्ष द्यावे लागले. आर्य समाजाच्या त्यांच्यावरील प्रभावामुळे ते कट्टर हिंदुत्ववादी बनले होते. तरीही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हिंदू-मुस्लिम ऐक्य ते आवश्यक समजत होते. कित्येक मुसलमान पुढारी या ऐक्याच्या बंधनापासून दूर गेले होते. त्यामुळे असहकार चळवळीवर घाला पडला. सांप्रदायिकता जागी होऊन तिने धोक्याची परिस्थिती उत्पन्न केली.

१९२४ मध्ये वायव्य सरहद्दीवर कोहात भागात हिंदु-मुस्लिम दंगा झाला. हिंदूंचा खूप छळ झाला. दोन दिवसाच्या या दंगलीत १५० हिंदू मारले गेले; आणि जवळजवळ चार हजार लोक जखमी झाले. जखमी लोकांना रावळपिंडीला हलविण्यात आले. महात्मा गांधींनी उपोषण आरंभिले. सांप्रदायिक ऐक्यासाठी संमेलन झाले. राष्ट्रीय पंचायत स्थापन झाली. पण प्रश्न सुटला नाही. कोहातच्या या अपघाताने लालाजींना फार दु:ख झाले. ते निराश झाले. असहाय हिंदूंच्या मदतीसाठी त्यांना उभे ठाकावेच लागले. मुसलमानांनी उभारलेल्या संघटनांविरुद्ध लालाजींनी 'हिंदू शुद्धि' आणि 'हिंदू संघटनेचे' कार्य आरंभिले. ते अव्याहत चालविले. लालाजींनी त्याचवेळी अशी शंका व्यक्त केली की, "पुढे जाऊन मुसलमान भारताचे विभाजन करून वेगळे राष्ट्र निर्माण करण्याची मागणी करू शकतील." ही गोष्ट लालाजींच्या दूरदृष्टित्वाची साक्ष पटविते.

१९२५ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या हिंदू-महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान लालाजींनी

मंडित केले. हिंदूधर्म आणि त्याचे रक्षण यावर दिलेल्या लालाजींच्या भाषणाने जनतेत जागृती निर्माण केली. ती खडबडून जागी झाली. १९२६ मध्ये जिनेव्हाला आंतर्राष्ट्रीय श्रमसंमेलन झाले. भारतीय श्रमिकांचे प्रतिनिधी म्हणून लालाजींनी त्यात भाग घेतला. ब्रिटन आणि फ्रांसमध्ये झालेल्या अशाच संमेलनातही त्यांनी भाग घेतला.

## दु:खी भारत

१९२७ मध्ये प्रकृती सुधारण्यासाठी लालाजी युरोपात गेले. याच दिवसात कॅथरिन मेयो या नावाची एक परदेशी महिला–पत्रकार भारतात आली होती. भारत भ्रमण करून तिने भारतीय नागरिकत्व, संस्कृती आणि लोकजीवनाचा अभ्यास केला. त्यानंतर ' मदर–इंडिया ' या नावाचे एक पुस्तक लिहिले. या महिला पत्रकाराला भारतात फक्त अज्ञान आणि घाणीचेच दर्शन घडले. या पुस्तकात भारताविषयीचे अनेक गैरसमज आणि चुका आहेत. महात्मा गांधींनी त्याला ' सॅनिटरी इंस्पेक्टरचा रिपोर्ट ' म्हटले व लेख लिहून या

पुस्तकाचे खंडन केले. मेयोचे हे पुस्तक प्रकाशित झाले तेव्हा लालाजी लंडनला होते. या पुस्तकामुळे भारत आणि लंडनमध्ये गोंधळ उडाला. भारतीय स्वातंत्र्याच्या विरोधकांच्या पैशाने प्रकाशित झालेले हे पुस्तक लालाजींनी वाचले. ते चूप बसू शकले नाहीत. भारतात परतल्यावर कॅथरिन मेयोच्या या पुस्तकाचे खंडन करण्यासाठी "अनहॅपी इंडिया (दुःखी भारत)" नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले. भारतात परतल्यावर त्यांनी प्रथम हे कार्य केले. मेयोच्या अपप्रचाराला लालाजींनी दिलेले हे चोख उत्तर होते.

## सायमन कमिशन

असहकार आंदोलनानंतर राजकीय हालचाली जवळजवळ बंद पडल्या होत्या. भारताच्या राज्य-घटनेचा विस्तार तसेच इतर आवश्यक प्रशासकीय सुधारणांसाठी सल्ला देण्यास ब्रिटिश शासनाने एक आयोग नेमले. सर जॉन सायमन हे या आयोगाचे अध्यक्ष होते. ते आणि इतर सहा ब्रिटिश सरकारचेच सदस्य होते. त्यात एकही

भारतीय नव्हता. भारतीयांचा अपमान करण्यासाठीच या आयोगाची रचना झाली, असे वाटत होते. केवळ इंग्रजच भारताच्या भविष्याचे शिल्पकार बनू शकत नाहीत, असे भारतीयांचे मत होते. म्हणूनच लालाजींच्या नेतृत्वाखाली सायमन आयोगाचा विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. सारा देश एकजुटीने उभा राहिला.

फेब्रुवारी १९२८ मध्ये लालाजींनी केंद्रीय विधान परिषदेत एक ठराव आणला "आयोगाची रचना आणि योजना या सभेला स्वीकारण्यासारखी नाही, असे ही सभा सरकारला सुचवू इच्छिते. त्यामुळे आयोगाचा या सभेशी कोणत्याच प्रकारचा संबंध राहणार नाही" या ठरावावरील लालाजींचे भाषण रोमांचक होते. विधान परिषदेत इंग्रज व सरकारी प्रतिनिधी मोठ्या संख्येत होते. लालाजींना माहीत होते की हे सगळे या ठरावाचा विरोध करणार आहेत. भारतीय प्रतिनिधींना लालाजींनी विनंती केली की, "ब्रिटिश शासनाच्या व जागतिक जनतेच्या दृष्टीने आम्ही गुलाम

आहोत, ही गोष्ट तुम्ही लक्षात ठेवा. ठरावावर मतदान करण्यापूर्वी हेही लक्षात असू द्या की १९१८ च्या साथीच्या रोगामुळे या देशातील ६ कोटी लोक मृत्युमुखी पडले. तसेच या देशातील दहा कोटी लोकांना दोनदा जेवणही मिळत नाही, ह्याचेही स्मरण ठेवा."

भारतासाठी आवश्यक ती घटना तयार करण्याचा ब्रिटिश पार्लमेंटला काय अधिकार आहे, असा गंभीर प्रश्न लालाजींनी उपस्थित केला. भारताचे भवितव्य पूर्णपणे भारतीयांच्याच हाती राहील, हा त्यांचा दृढसंकल्प होता. मोतीलाल नेहरू आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे निवेदन तयार झाले. त्यांत ब्रिटिशांच्या धोरणाचा कडाडून विरोध करण्यात आला. या नेहरू रिपोर्टच्या प्रचारासाठी लालाजींनी संपूर्ण भारताचा दौरा केला. त्यांनी अशीही घोषणा केली की, "या नेहरू रिपोर्टचा विरोध करणे म्हणजे स्वराज्याचाच विरोध करणे होय. असे लोक भारताचेच शत्रू होत."

## साम्राज्यशाहीचा आघात

३० ऑक्टोबर १९२८ हा भारताच्या इतिहासातील एक काळा दिवस होय. या दिवशी सायमन कमिशन लाहोरला यायचे होते. शहरात गडबड होऊ नये यासाठी शासनाने सर्व प्रकारची सिद्धता ठेवली होती. शहरात निदर्शने, सभा यावर बंदी हुकूम लागू केला होता. त्या दिवशी लालाजींची प्रकृती चांगली नव्हती. तरीही सायमन कमिशनचा विरोध करण्यासाठी निदर्शनाचे नेतृत्व करावयास ते तयार झाले.

कमिशन लाहोरात आले एकीकडे देशद्रोही लोकांनी त्याचे स्वागत आरंभिले होते तर दुसरीकडे क्रांतिकारकांनी विरोधी निदर्शन केले. त्यात तरुणांनी विशेष भाग घेऊन निदर्शन अधिक उग्र केले. शहरात पूर्ण हरताळ पाळण्यात आला होता. सगळीकडे काळ्या झेंड्यांचे छत तयार झाले होते. "सायमन परत जा" या घोषणेने सारा आसमंत व्यापून टाकला होता. निदर्शनासमोर नरसिंहावतार शोभणारे लाला लजपतराय चालत होते. कमिशनला

घेऊन येणारी गाडी स्थानकावर येताच "सायमन परत जा" अशी गगनभेदी घोषणा देण्यात आली. सारा पोलीस बंदोबस्त मोडला गेला. लोकांची गर्दी इतकी होती की कुणालाही आपल्या ठिकाणा-वरून हलणे शक्य नव्हते. पोलीसांनी लाठीहल्ला सुरू केला. निरपराध जनतेचे रक्त वाहू लागले. सुखदेव, यशपाल, भगवतीचरण आदी मित्र लालाजींभोवती कडे करून उभे ठाकले. पोलीस अधिकारी स्कॉटने लालाजी व त्यांच्या मित्रांना पाहिले. स्कॉटने लालाजींच्या रक्षकावर आघात करण्याची आज्ञा दिली. सँडर्स नावाचा अधिकारी पुढे सरसावला. लालाजीवर लाठीचे वार करू लागला. यामुळे परिस्थिती बिघडेल, रक्तपात होईल, अशी शंका आल्यामुळे लालाजींनी आपल्या क्रांतिकारक मित्रांना तेथून निघून जाण्याची सूचना दिली. गर्दी पांगली.

त्याच दिवशी संध्याकाळी शहरात एक विराट सभा झाली. पोलीसांच्या या क्रूर कृत्याचा कडाडून निषेध करण्यात आला. सायमन कमि-

शनवर बहिष्कार टाकला गेला. सभेच्या ठिकाणी उपपर्यवेक्षक नील उपस्थित होता. लालाजी नील-कडे इशारा करून, व त्याला नीट समजावे म्हणून इंग्रजीत म्हणाले, "माझ्या शरीरावर करण्यात आलेला वार हा ब्रिटिश साम्राज्याच्या शवपेटीवर ठोकण्यात आलेला शेवटचा खिळा ठरेल."

पंजाबच्या तरुणांना लालाजींची फक्त सूचना मिळण्याचाच अवकाश होता की त्यांनी रक्ताचे पाट वाहविले असते. परंतु लालाजी तर 'अहिंसा परमो धर्मः' मानणारे होते. भारतीय जनतेला आपला राग आणि प्रक्षोभ गिळून टाकावा लागला. त्याच आठवड्यात लालाजींनी अखिल भारतीय काँग्रेस समिती व सर्वपक्षीय संमेलन यात भाग घेतला. अशक्तपणामुळे तेथून ते लाहो-रला परतले. आजारपणामुळे त्यांना आंथरुणावर पडून राहणे भाग पडले. १७ नोव्हेंबर १९२८ ला हृदयविकाराने ते स्वर्गवासी झाले. लाठीच्या प्रहारामुळेच त्यांचा अंत झाला असे भारतीय जनतेस वाटले. पोलीसांनी जाणूनबुजून केलेला हा



माझ्या शरीरावर करण्यात आलेला वार हा ब्रिटिश साम्राज्याचा शवपेटीवर ठोकण्यात आलेला शेवटचा खिळा ठरेल.

खून आहे, अशी त्यांची भावना झाली. त्यांच्या अंत्ययात्रेला लक्षावधी लोक उपस्थित होते.

## देश विसरू शकला नाही

लालाजींच्या मृत्यूने चळवळ यत्किंचितही मंदावली नाही. याउलट तिने रुद्रावतार धारण केला. काँग्रेसपक्षाने ‘करमाफीची चळवळ’ सुरू केली. लालाजींचे मरण सहजगत्या विसरणे भारतीय जनतेला शक्य नव्हते. त्यामुळे आपल्या आदरणीय नेत्यावर जाणीवपूर्वक करण्यात आलेल्या अत्याचाराचा बदला घ्यायला ती सिद्ध झाली. क्रांतीच्या प्रखर ज्वाला सर्वत्र भडकल्या. लालाजींवर वार करणारा मुख्य पोलीस अधिकारी सँडर्स याचा तरुण क्रांतिकारक भगतसिंह याने गोळ्या घालून मुडदा पाडला. ही घटना लालाजींच्या मृत्यूनंतर बरोबर एक महिन्याने म्हणजेच १७ डिसेंबर रोजी घडली. पुढील वर्षी इंग्रजांनी भगतसिंहाला फाशी दिले.

## पंजाबचा सिंह

पंजाबसिंह लाला लजपतराय यांनी भारतीय जनतेला साहसाचा धडा शिकविला. पारतंत्र्याच्या बेडीने बंदिस्त असलेल्या भारतीय जनतेला त्यांनी दिलेला संदेश होता, "भीक मागून किंवा विनंती करून स्वातंत्र्य कधीच मिळत नाही. स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी झुंज आणि बलिदान आवश्यक असते." लालाजींनी आजीवन साहसी लढा दिला. म्हणून लोक त्यांना 'पंजाब केसरी' म्हणू लागले. त्यांचे बलिदान रणक्षेत्रावरील वीर मरणासारखेच होते.

## बहुमुखी वज्र

हुतात्मा लाला लजपतराय सद्‌गुणांचे आगर होते. कार्यकौशल्य, अथक कष्ट आणि राष्ट्रभक्ती या गुणांमुळे त्याचे अष्टपैलू व्यक्तित्व अधिकच खुलून दिसे. ते फारच प्रेमळ होते. देश–परदेशात राष्ट्रकार्यासाठी त्यांनी जोडलेल्या मित्रांची संख्या अमाप होती. ते असामान्य वक्ते होते. व्यासपीठा-वरून तासन् तास प्रभावी, प्रक्षोभक आणि उद्‌बोधक रीतीने ते बोलत. लोक मंत्रमुग्ध होऊन

त्यांचे भाषण ऐकत. खडबडून जागे होत. या क्षेत्रात ते खरोखरीच 'नरकेसरी' होते.

या मेधावी पुढाऱ्याने शिक्षणक्षेत्राची देखील तन–मन–धनाने सेवा केली. त्यांच्या या क्षेत्रातील राष्ट्रप्रेमाची प्रतीके डी. ए. व्ही. कॉलेज, नॅशनल कॉलेज व टिळक राजनीतिशास्त्र विद्यालय ही होत.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांची सेवाही काही कमी नाही. त्यांनी चालविलेले उर्दू दैनिक 'वंदे मातरम्' आणि इंग्रजी साप्ताहिक 'दि पिपल' ही उत्तम दर्जाची आदर्श वर्तमानपत्रे होत.

वाणिज्य क्षेत्रात देखील त्यांनी आपली छाप बसविली. 'पंजाब नॅशनल बँक' आणि 'लक्ष्मी इन्शुरन्स कंपनी' त्यांनीच स्थापन केली. आर्य समाजाचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम केले. अस्पृश्यतेविरुद्ध लढा उभारला. महात्मा गांधींनी 'हरिजन सेवक संघ' स्थापन केला तेव्हा त्या संस्थेसाठी त्यांनी काम केले. अनाथ मुलांसाठी तर ते पित्यासमानच होते. देशातील अनेक

अनाथालयांच्या स्थापनेस त्यांचे हात लागले होते. ‘गुलाब देवी इस्पितळ’, ‘सर्व्हंटस ऑफ पिपल सोसायटी’ या संस्था त्या श्रेष्ठ व्यक्तित्वाची जिवंत स्मारके होत.

भारतात समाजवादाची पायाभरणी करणारांपैकी लालाजी एक होते ब्रिटनमधील समाजवादाचे पुरस्कर्ते हेन्री मेथर्स, बियाट्रिस वेब, लॅम्सबरी आदींना ते चांगले ओळखत होते.

मजूरसंघटनेचेही ते पुढारी होते. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (अखिल भारतीय श्रमिक महासभेची, इन्टक) स्थापना करून ते तिचे अध्यक्ष बनले. मजुरांची परिस्थिती सुधारावी म्हणून सुनियोजित प्रयत्नांचा प्रारंभ त्यांनीच केला. कोणत्याही उद्योगात मिळणाऱ्या फायद्यात श्रमिकांना वाटा मिळायला हवा, असे त्यांचे मत होते.

त्यांनी सामान्य जनतेच्या अंतःकरणात स्वातंत्र्यप्राप्तीची महत्त्वाकांक्षा उत्पन्न केली. जनतेला दास्यशृंखला तोडून फेकण्यासाठी त्यांनी संघटित केले. लालाजी या जनशक्तीची साक्षात

मूर्ती होते. महात्मा गांधी म्हणाले होते, "भारतीय आकाशावर जोपावेतो सूर्यप्रकाश राहील तोपावेतो लालाजींसारख्या व्यक्ती अमर आहेत."

लाला लजपतराय एकदा म्हणाले होते, "भारतात प्रकाशित होणाऱ्या सर्व वर्तमानपत्रांवर जर मी माझा प्रभाव पाडू शकलो तर त्यांच्या दैनिक अंकाच्या पहिल्या पानावर मोठ्या अक्षरात मथळा असेल--

मुलांना दूध,
मोठ्यांना अन्न,
आणि सर्वांनाच शिक्षण"

* *

वाचनालय शाखा.
9395 / दि- ६/१/८२
BVBK-0401315

॥ श्री ॥

# भारत-भारती

## बाल-पुस्तकमाला

[ मराठी ]

१. स्वामी विवेकानंद
२. स्वातंत्र्यवीर सावरकर
३. पं. दीनदयाल उपाध्याय
४. नचिकेता
५. भगिनी निवेदिता
६. वीर अभिमन्यु
७. विश्वामित्र
८. लाला लजपतराय
९. महासती द्रौपदी

□ □

किमत प्रत्येकी रुपये २-००

विविधता में एकता का दर्शन
भाषिक एकात्मता का अनुभव

# " गीत - भारती "

अपने देश की १४ भाषाओं के ६६ राष्ट्रीय गीत
देवनागरी लिपि में
साथ में उनका हिन्दी - भावार्थ

आकार १/८ क्राऊन : पृष्ठ संख्या १५०

मूल्य मात्र रु. ४–५०

प्राप्ति-स्थान
**भारत–भारती**
बाल-पुस्तकमाला
रुईकर, पथ नागपुर–४४० ००२